# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**दाखल झालेले अपील**

**क्र. मुमाआ/नों.क्र.२११३११/२१/अ.क्र.४४४/२५/०१**
**क्र. मुमाआ/नों.क्र.२११३१०/२१/अ.क्र.४४५/२५/०१**
**क्र. मुमाआ/नों.क्र.२११३०९/२१/अ.क्र.४४६/२५/०१**
**क्र. मुमाआ/नों.क्र.२११३०८/२१/अ.क्र.४४७/२५/०१**

**श्री. मंगेश बी. कदम**
द्वारा-बिल्डिंग नं.१, ब्लॉक नं. ११०, १ ला माळा,
स्वदेशी मिल कंपाउंड, चुनाभट्टी पूर्व,
मुंबई- ४०० ०२२.

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (स्था.) मप्रचा**
उप प्रमुख अभियंता (स्था.) मप्रचा यांचे कार्यालय,
अभियांत्रिकी संकुल, २ रा मजला, डॉ.ई.मोझेस रोड, वरळी नाका,
मुंबई-४०० ०१८.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप प्रमुख अभियंता (स्था.) मप्रचा**
उप प्रमुख अभियंता (स्था.) मप्रचा यांचे कार्यालय,
अभियांत्रिकी संकुल, २ रा मजला, डॉ.ई.मोझेस रोड, वरळी नाका,
मुंबई- ४०० ०१८.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०८.०५.२०२५**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | अनुपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| प्रथम अपीलीय अधिकारी | : | उपस्थित |

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| २५.०२.२०२० | २०.०३.२०२० | ०५.११.२०२० | १०.१२.२०२० |
| २५.०२.२०२० | २०.०३.२०२० | ०५.११.२०२० | १०.१२.२०२० |
| २५.०२.२०२० | २०.०३.२०२० | ०५.११.२०२० | १०.१२.२०२० |
| २५.०२.२०२० | २०.०३.२०२० | ०५.११.२०२० | १०.१२.२०२० |

अपीलार्थी यांनी माहितीच्या अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २५.०२.२०२० रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी "मलनि:सारण प्रचलन (स्थापत्य)" माहितीची मागणी केली आहे.

सदर माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी दि. २०.०३.२०२० "अपीलार्थी यांना अपेक्षित असलेल्या माहितीकरिता आकारण्यात आलेले शुल्क भरल्यानंतर माहिती पुरविण्यात येईल", असे उत्तरान्वेय कळविण्यात आले आहे.

त्यानंतर अपीलार्थी यांनी दि. ०५.११.२०२० रोजी कलम १९(१) नुसार प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे "कोरोना महामारीमुळे आपल्या विभाग कार्यालयामध्ये येण्यास व अपील करण्यास मला विलंब झाला व मला माहिती निरीक्षण अवलोकन देऊन चलन शुल्क देण्यात यावे", असे कारण नमूद करुन प्रथम अपील अर्ज दाखल केला आहे. त्यावर "अपीलार्थी यांना सात दिवसांत निरिक्षणासाठी बोलविण्यात यावे व निरिक्षणानंतर चलन शुल्क भरुन त्यांना आवश्यक असलेल्या माहितीच्या प्रती देण्यात याव्यात" असे आदेश पारित करुन प्रथम अपील अर्ज निकाली काढण्यात आला आहे.

तद्नंतर अपीलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) नुसार आयोगाकडे दि. २२.०३.२०२१ रोजी "जन माहिती अधिकारी यांनी पत्र पाठविले व प्रथम अपील आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांना व्यक्तिशः भेटून देखील माहिती निरिक्षण अवलोकन देण्यात आले नाही. व आपला भ्रष्टाचार उघड होईल या कारणाने जाणिवपूर्वक माहिती निरिक्षण देता नाहीत. त्यामुळे यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई व आयुक्तांमार्फत कामाची सखोल चौकशी करावी", असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

सदर द्वितीय अपीलावर आज दि. ०८.०५.२०२५ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली आहे. आज सुनावणी दरम्यान अपीलार्थी यांना सुनावणी नोटीस प्राप्त असुन कोणतीही पूर्व सूचना न देता अनुपस्थित आहे. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (स्था.) मप्रचा अनुपस्थित आहे. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (स्था.) मप्रचा, श्री. सुधीर कालेकर, विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (स्था.) मप्रचा, श्री. ताराकांत पवार उपस्थित आहेत.

आजच्या सुनावणीच्या वेळी अपीलार्थी अनुपस्थित असल्यामुळे त्यांची बाजू समजून घेता आली नाही.

विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (स्था.) मप्रचा, श्री. ताराकांत पवार यांनी आयोगास सादर केले की, प्रथम अपील आदेशानंतर अपीलार्थी यांना माहितीचे निरिक्षण करण्याकरिता कार्यालयात बोलविण्यात आले होते, परंतु अपीलार्थी उपस्थित राहिले नाही.

उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (स्था.) मप्रचा यांनी अपीलार्थी यांना अपेक्षित असलेल्या माहितीचे सशुल्क भरण्याकरिता विहीत मुदतीत सूचित केले होते, तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (स्था.) मप्रचा यांनी

प्रथम अपील अर्जाची सुनावणी घेऊन "अपीलार्थी यांना सात दिवसांत निरिक्षणासाठी बोलविण्यात यावे व निरिक्षणानंतर चलन शुल्क भरुन त्यांना आवश्यक असलेल्या माहितीच्या प्रती देण्यात याव्यात" असे आदेश पारित केले होते. तथापि जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (स्था.) मप्रचा व प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (स्था.) मप्रचा यांनी अपीलार्थी यांना सकारत्मक दृष्टी माहिती प्राप्त करुन देण्याचा प्रयत्न केला असून अपीलार्थी यांना माहिती प्राप्त करुन घेण्यात कोणताही स्वारस्य दिसून येत नाही.

सदर माहिती सन २०१८-२०१९ या कालावधीतील असून माहिती देण्याचा कालमर्यादा उलटून गेला आहे. तथापि अपीलार्थी यांना माहिती प्राप्त करुन घेण्याचा कोणताही स्वारस्य असल्याचा दिसून येत नाही. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (स्था.) मप्रचा यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने कलम २(च) नुसार उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस तात्काळ व विनामुल्य प्रदान करण्यात यावी. तसेच सदर माहिती सॉफट कॉपीमध्ये उपलब्ध असल्यास तर अपीलार्थी यांना सॉफट कॉपीमध्ये माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी. यापुढे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील नमूद कालावधीच्या तरतुदीचे काटेकोर पालन करावे. या निर्देशासह प्रस्तुत व्दितीय अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

**१. वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.**
**२. वरील सर्व अपिले निकाली काढण्यात येत आहे.**

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : ०८.०५.२०२५**

State Information Commission * Maharashtra *

**( राहुल पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**